


साप्ताहिक

संघर्षाचा आवाज

प्रशासकीय व सामाजिक व्यवस्थेचा समतोल साधणारा...

पुणे, ठाणे आणि मुंबईसह महाराष्ट्रातील घडामोडींचा वेध घेणारे वृत्तपत्र

संपादक : संजय सोनवणे

■ RNI. NO. MAHMAR/2013/52905
■ DECL. NO. SDM/SR/11/2013
■ https://sangharshachaaawaz.in

■ वर्ष : १४ वे ■ अंक : १२ वा ■ सोमवार दि.१२ ऑक्टोंबर ते १८ ऑक्टोंबर २०२६ ■ किंमत : २ रु. ■ पाने – ०४

नाना पाटेकरांचा श्रीमंत... पान २ वर | धम्मचक्र प्रर्वतन : मानवी... पान ३ वर | दुष्काळ, पाऊस, पीक नुकसान... पान ४ वर

एमपीएससी गैरप्रकारांची निवृत्त न्यायाधीशांकडून चौकशी; चौकशी समितीत तुकाराम मुंढे सचिव : मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आंदोलनस्थळी केली घोषणा

पुणे : विवेक भिमनवारांना सक्तीच्या रजेवर अखेर जावेच लागले. आंदोलनकर्त्यांनी प्रचंड जल्लोष करत विवेकानंद पाटील आणि रोहित पवारांना उचलून घेवून आनंद साजरा केला. भरती प्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि यंत्रणेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांवर धडक कारवाई व्हावी, यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे हजारो विद्यार्थी पुण्यात लोकशाही मार्गाने आंदोलन करीत एस.एम.जोशी पूल येथे २ ऑक्टोबरपासून हे आंदोलन सुरू होते.

एमपीएससीमध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने व्ही.राधा समिती काम करत आहेच. आता निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गैरप्रकारांच्या



आरोपांची चौकशी करेल. या समितीचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे काम करतील, अशी घोषणा सरकारचे प्रतिनिधी म्हणून आलेले मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी रविवारी रात्री केली. तसेच एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भिमनवार चौकशी होईपर्यंत रजेवर जाणार असल्याने विद्यार्थ्यांचे आंदोलन मागे घेण्यात आले.

एस.एम.जोशी पूल येथे २ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या आंदोलनस्थळी भोसले बोलत होते. आंदोलकांची बाजू ऐकून घेत त्यांनी चर्चा केली. याप्रसंगी आमदार रोहित पवार आणि विश्वजित कदम यांच्यासह आंदोलक प्रतिनिधी उपस्थित होते. विविध आंदोलनदरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यात येणार आहेत आणि एमपीएससीमार्फत तसेच सरळसेवा भरतीच्या माध्यमातून तीन वर्षात सुमारे ७० हजार पदे भरण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे.

मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी काही प्रमुख मागण्या मान्य केल्याचे आ.रोहित पवार यांनी जाहीर केले. यात भरती प्रक्रिया वर्षभरात पूर्ण करणार, सर्व पदाची परीक्षा ऑफलाइन होणार, गट क प्रतीक्षा यादी जाहीर करणार, वन कार्ड योजना मान्य, शुल्क निश्चिती व्ही.राधा समिती करेल, ३०० रूपयांच्या आत फी असेल, चालू घडामोडी प्रश्नांची कालमर्यादा निश्चित करणे ही मागणी मान्य, शासकीय जागांचा आकृतीबंध दरवर्षी प्रसिध्द करण्यात येईल. राज्य सेवा २०२७ या जाहिरातीमध्ये किमान ५०० जागा भरणार, स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना स्टायफंड यावर सरकार सकारात्मक आहे. तसेच मागण्या रखडल्या तर अलका चौक आहेच असेही रोहित पवार म्हणाले. **(पान २ वर)**

तक्रारी झाल्या हजार, कारवाईचा कुठे समाचार? पोलीस, पालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ, जवाब दो लाऊडस्पीकरविरोधी पुणेकर मंचाचे आंदोलन

पुणे : नवरात्रीच्या सुरवातीला पुन्हा एकदा कर्णकर्कश्य लाऊडस्पीकरचा विषय पुढे आला आहे. गणेश उत्सव होवून दोन आठवडे झाल्यावर आता पुन्हा रस्त्यात मांडव,स्पीकर, ढोल वाजणे सुरु झाले आहे. या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषण कायद्याची कडक अंमलबजावणीची मागणी करत बालगंधर्व चौकात नुकतेच पुणेकर मंचाने आंदोलन केले.

गणेश विसर्जन मिरवणूक २६ तारखेला संध्याकाळी संपली. आता तब्बल दोन आठवडे उलटल्यानंतरही या



उत्सवाच्या काळात झालेल्या ध्वनी प्रदूषण कायदाभंगाच्या तक्रारी, नोंदी, गुन्हे याची माहिती अजूनही जाहीर करण्यात आलेली नाही, **(पान २ वर)**

धम्मचक्र प्रवर्तन दिन; पुणे–नागपूर अनारक्षित विशेष गाड्या

पुणे : धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरला जाणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने पुणे-नागपूर दरम्यान अनारक्षित विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्यांमुळे ऐन सणासुदीच्या काळात नागपूरला जाणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. पुणे आणि नागपूरदरम्यान या गाड्यांच्या प्रत्येकी दोन फेऱ्या होणार आहेत.

गाडी क्रमांक ०१२१५ पुणे-नागपूर अनारक्षित विशेष १९ आणि २१



ऑक्टोबर रोजी पुणे स्थानकातून दुपारी २.५० वाजता सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी७.३० वाजता नागपूरला पोहोचेल. परतीच्या **(पान २ वर)**





संपादकीय...

नाना पाटेकरांचा श्रीमंत वर्गाला आरसा दाखवणारा संदेश?

नाना पाटेकर आणि मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी सप्टेंबर २०१५ मध्ये 'नाम फाउंडेशन'ची स्थापना केली. महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांची वेदना, वाढत्या शेतकरी आत्महत्या आणि ग्रामीण भागातील पाण्याची गंभीर समस्या यामुळे या उपक्रमाला आकार मिळाला.

एका बाजूला चित्रपटसृष्टीतून मिळालेली प्रसिद्धी आणि आर्थिक यश, तर दुसऱ्या बाजूला जगण्यासाठी संघर्ष करणारा शेतकरी या दोन वास्तवांमधील दरी नानांच्या सामाजिक कार्याच्या केंद्रस्थानी आली. नाम फाउंडेशनने शेतकरी आत्महत्यांमुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांना मदत करण्यापासून सुरुवात केली. पुढे जलसंधारण, पाणीसाठ्यांचे पुनरुज्जीवन, ग्रामीण विकास आणि शेतकरी कुटुंबांच्या पुनर्वसनासारख्या कामांवर भर दिला. या कार्यातून एक महत्त्वाची गोष्ट समोर येते. समाजातील दुःख दूर करण्यासाठी केवळ सहानुभूती पुरेशी नसते; स्वतःकडे असलेल्या साधनसंपत्तीचा काही भाग समाजाच्या उन्नतीसाठी वापरण्याची तयारीही आवश्यक असते.

नाम फाउंडेशनची स्थापना म्हणजे प्रत्येक श्रीमंत व्यक्तीने आपली संपत्ती सोडून द्यावी, असा संदेश नाही. उलट, संपत्तीचा उपयोग केवळ वैयक्तिक सुखासाठी न करता समाजातील गरजू लोकांच्या आयुष्यात बदल घडवण्यासाठीही करता येतो, हे दाखवणारा हा प्रयत्न आहे. माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्या हातात काहीच नसते. आयुष्यभर तो शिक्षण, नोकरी, व्यवसाय, राजकारण किंवा इतर मार्गांनी संपत्ती मिळवतो. त्यासाठी अनेकदा दिवस-रात्र मेहनत करतो. काही जण प्रामाणिकपणे कष्ट करतात, तर काही जण अधिक पैसा मिळवण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करतात. पण आयुष्याच्या अंतिम टप्प्यावर एक गोष्ट प्रत्येकाला स्वीकारावी लागते-संपत्ती कितीही मोठी असली, तरी मानवी आयुष्य अमर्याद नाही. आपण कमावलेला पैसा, बांधलेले बंगले, खरेदी केलेल्या गाड्या आणि मिळवलेली पदे आपल्या मालकीची असू शकतात; परंतु आयुष्याची हमी कोणाकडेच नाही. मग प्रश्न पडतो, संपत्तीचा उपयोग केवळ पुढील पिढ्यांसाठी आणखी संपत्ती साठवण्यातच करायचा का? की त्या संपत्तीचा काही भाग अशा कामांसाठी वापरायचा, ज्यामुळे गरजू व्यक्तीला उपचार मिळतील, गरीब मुलाला शिक्षण मिळेल, शेतकऱ्याला पाण्याची सोय होईल आणि एखाद्या निराधार कुटुंबाला पुन्हा उभे राहण्याची संधी मिळेल? उद्देश एवढाच की जिवंत असताना पैशाचा उपयोग जीवन समृद्ध करण्यासाठी झाला पाहिजे. स्वतःचेही आणि इतरांचेही. नाना पाटेकर यांच्या नाम फाउंडेशनच्या कार्याचा सर्वांत महत्त्वाचा संदेश हाच मानता येईल की प्रसिद्धी आणि संपत्ती यांचा उपयोग समाजातील वेदना कमी करण्यासाठीही करता येतो. गर्भश्रीमंत वर्गाने लक्षात ठेवावे. पैसा कमावणे ही तुमची क्षमता असू शकते; पण त्या पैशातून किती माणसांच्या आयुष्यात आशा निर्माण केली, ही तुमच्या सामाजिक योगदानाची कसोटी आहे.

मृत्यू अटळ आहे, पण तो येण्यापूर्वी आपण काय करतो, हे आपल्या हातात आहे. आपल्या पश्चात संपत्ती वारसांकडे जाईल; मात्र आपण केलेल्या चांगल्या कामांचा परिणाम अनेकांच्या आयुष्यात दीर्घकाळ टिकू शकतो. मराठी रंगभूमी तसेच मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीत नाना पाटेकर यांनी आपल्या प्रभावी अभिनयाने स्वतंत्र ओळख निर्माण केली. प्रदीर्घ कलाप्रवासात त्यांनी विविधांगी भूमिका साकारत रसिकांच्या मनावर ठसा उमटविला. अभिनयासोबतच सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

अंत्यसंस्कारापूर्वी नाना पाटेकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी पुण्यातील डोणजे येथे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षातील नेते, पुढारी, प्रशासनातील प्रमुख अधिकारी, नागरिक, कलाकार, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती, चाहते तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी अंत्यदर्शन घेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

शेवटी प्रश्न एवढाच आपल्याकडे किती आहे, हा प्रश्न मोठा की आपल्यामुळे किती जणांचे आयुष्य चांगले झाले, हा प्रश्न मोठा? या प्रश्नाचे उत्तर प्रत्येकाने स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीला द्यायचे आहे.


साप्ताहिक संघर्षाचा आवाज मालक – यशोदा उत्तरेश्वर सोनवणे, यांनी सा. संघर्षाचा आवाज संपादक, मुद्रक, प्रकाशक संजय सोनवणे यांना सर्व अधिकार दिले आहे. त्यांनी श्री साई ग्राफिक्स, डी. एस. के. चिंतामणी कॉम्प्लेक्स. विंग – सी – २, शॉप नं. ३८, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० येथे छापून सर्व्हे नं. ८, नेताजीनगर, येरवडा, पुणे – ४११००६ येथून प्रकाशित केले.

Yashoda Uttareshwar Sonwane, the owner of Weekly Sangharshacha Aawaz, has given all rights to the Sanjay Uttareshwar Sonwane, editor, printer, publisher of Weekly Sangharshacha Aawaz. This weekly is printed at Shri Sai Graphics, D. S. K. Chintamani Complex, Wing C-2, Shop No. 38, Shaniwar Peth, Pune - 411030 and published at Survey No. 8 Netajinagar, Yerawada, Pune - 411006.

या साप्ताहिकात प्रसिध्द झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयांतर्गत सोडवली जातील अन्यत्र कोठेही नाही.

आपल्या प्रतिक्रिया येथे नोंदवाव्यात
Email : sangharshachaaawaz22@gmail.com
Email : sangharshachaaawaz@rediffmail.com
Mob. : 7276871008 / 9665487134



मागील अंकावरून

दुसऱ्याचे नुकसान करण्याची इच्छा धरणारे, वाईट मित्र, सोबती ही सहा कारणे मनुष्याच्या सत्यानाशास कारणीभूत ठरतात.

ज्याचे मित्र व सहयोगी, सोबती जर पापानी बरबटले असतील तर तो दोन्ही जगात नष्ट-भ्रष्ट होईल. या लोकात व परलोकात देखील जुगार, परनारीगमन, दारू, नाच, गाणे, दिवसभर झोप. अनेक गल्ली बोळांत फिरणे, वाईटाची संगत, परकोटीचा लोभ अशा एकूण नऊ कारणांनी मनुष्य बरबाद होतो. नेस्तनाबूत होतो.

जो जुगार खेळतो, जो नशापाणी करतो, परस्त्रीशी अनैतिक संबंध ठेवतो. जो नीच लोकांची संगत करतो, ज्ञानी लोकांची संगत करित नाही, त्यांचा सहवास टाळतो त्याची अधोगती होते. जशी कृष्ण पक्षातील चंद्राची कला. **क्रमश:**

सिगोलवाद सुत्त

मला उपलब्ध वाङमयाद्वारे धर्मासंबंधी जे ज्ञान प्राप्त झाले. त्याचे सर्वासाठी विवरण करावे असे वाटले आणि धम्मप्रचाराच्या कामास सुरूवात करावी असे वाटले. विचार मनाना भावला लिखाणाचे अंग नोकरीत असल्यापासून आहे, धम्मासंबंधी मला पटलेल्या लहान विषयावर आधारित बाबी पुस्तकरूपाने समाजास देणे ही योजना आहे. भगवंताच्या सुत्तातील अर्थ मला समजला तसा मी मांडला आहे, अर्थात माझ्या आचरणाला धर्म मी सांगतोय. मला लेखक व्हायचे नाही. धम्माच्या आचरणाद्वारा प्रचार करावयाचा आहे. त्यासाठी माझ्या बुध्दीनुसार, आकलनानुसार मी प्रयत्न करण्याचे धाडस केले आहे व ते पुढेही चालू ठेवणार आहे. प्रोत्साहन मिळाल्यास माझाही हुरूप वाढेल व पुढील काम विनाविलंबाने करीन.

जयभीम!

उत्तमराव सोनवणे

एमपीएससी गैरप्रकारांची निवृत्त न्यायाधीशांकडून चौकशी;...

(पान १ वरून) महाराष्ट्र सरकारमध्ये आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची एकेकाळी वारंवार बदली करण्यात येत असे. ते सहजा सत्ताधारी आणि विरोधकांना परवडत नसे म्हणून त्यांची बदली करण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक एकत्र आल्याले आपण सर्वांनी पाहिले आहे. आणि त्यांच्या कार्यकाळात अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून जेवढा कार्यकाळ त्यांनी आतापर्यंत पूर्ण केला आहे. तेवढा कार्यकाळ याअगोदरच्या कोणत्याही विभागात पुर्ण केलेला नाही. पण सध्या त्यांची लोकप्रियता एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे की, खुद्द महाराष्ट्र सरकारला आणि सत्ताधाऱ्यांना स्वत:चा बचाव करण्यासाठी आणि पारदर्शक चौकशी केल्या जाईल. याची शाश्वती विद्यार्थ्यांना येण्यासाठी आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती केल्याचे मोठ्या प्रमाणात चर्चा होताना दिसत आहे. एकंदरित तुकाराम मुंढे हे एकमेव पारदर्शक अधिकारी आहेत का? असाही प्रश्न या निमित्ताने समोर येत आहे.

महाराष्ट्र सरकारला डोकेदुखी ठरणारी पुण्यातील एमपीएससी आंदोलन सध्यातरी मागे हटताना दिसत आहे. पण यापुढे सरकारवर ही वेळ येवू नये यासाठी अनेक तुकाराम मुंढे सारखे अधिकारी पुढे आले पाहिजे. हे मात्र नक्की.

धम्मचक्र प्रवर्तन दिन; पुणे–नागपूर अनारक्षित विशेष...

(पान १ वरून) प्रवासासाठी गाडी क्रमांक ०१२१६ नागपूर-पुणे अनारक्षित विशेष २० आणि २२ ऑक्टोबर रोजी नागपूर येथून रात्री ११ वाजता सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता पुण्यात पोहोचेल.

विशेष गाड्या दौंड कॉर्ड लाईन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, अंकाई, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तीजापूर, बडनेरा, धामणगाव, पुलगाव, वर्धा आणि अजनी येथे थांबतील. त्यामुळे मार्गावरील विविध शहरांतील प्रवाशांनाही या गाड्यांचा लाभ घेता येणार आहे.

यासाठी आरक्षणाची आवश्यकता नसून, प्रवाशांना यूटीएस मोबाइल ॲप किंवा रेल्वे स्थानकांवरील तिकीट खिडक्यांमधून तिकीट घेता येईल. मेल, एक्स्प्रेस गाड्यांना लागू असलेले सामान्य भाडे आकारण्यात येणार आहे. अशी माहिती रेल्वे विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

तक्रारी झाल्या हजार, कारवाईचा कुठे समाचार? पोलीस, पालिका,...

(पान १ वरून) राष्ट्रीय हरित लवादाने सायलेंट झोन बाबतीत अतिशय कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते. दुसरीकडे मुंबई हायकोर्टाने स्वतःहून या प्रदूषणाची दखल घेत केस दाखल करण्याबाबत महत्त्वाचे आदेश दिलेले होते. त्यानुसार मुख्यत्वे सर्वत्र आवाजाची तीव्रता मोजण्याची यंत्रणा, तसेच परवाने प्रदर्शित करण्याच्या अटी आणि डिपॉझिट घेण्याचे व तातडीने यासंदर्भात ध्वनिवर्धन साहित्याचे जप्तीचे आदेश दिलेले होते. २०२४ या आदेशाप्रमाणे याबाबत अनेक नियम कोर्टाने घालून दिलेले आहेत. त्यानुसार लोखंडी सिलेंडर हे वाद्य म्हणून वाजवता येणार नाही, तसेच एकत्रित मंडळांना परवाना देताना एकूण आवाज मर्यादाभंग होणार नाही याची काळजी घेणे तसेच सात दिवसाच्या आत सर्व अहवाल जाहीर करणे, प्रत्येक मंडळाच्या समोरच्या मोजलेल्या आवाजाची तीव्रता ही २४ तासाच्या आत सदर ठिकाणी प्रदर्शित करणे असे अनेक सविस्तर आदेश मुंबई हायकोर्ट आणि हरित लवादाने पोलीस तसेच पुणे शहर आयुक्त आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेले होते. परंतु याच्या बाबतीत पोलीस यंत्रणा व प्रदूषण मंडळ तसेच महानगरपालिका पूर्णपणे अयशस्वी ठरल्याचे उघड झालेले आहे असा आरोप आज आंदोलनात करण्यात आला. त्यामुळे तातडीने सर्व दिवसांच्या डिसिबल मोजणीची नोंदींचा सविस्तर अहवाल जाहीर करण्यात यावा तसेच वेगवेगळ्या मंडळाच्या संदर्भात आपण केलेल्या कारवाईची माहिती जाहीर करण्यात यावी अशी मागणी लाऊडस्पीकरविरोधी पुणेकर मंचाने केली आहे.

आता नवरात्र त्यानंतर दिवाळी व तसेच इतर धर्माचे, महापुरुषांचे सण साजरे होतील. त्या काळामध्ये या कायद्याची, न्यायालयीन आदेशाची कडक अंमलबजावणी होणे गरजेचे असल्यामुळे पुणेकराच्या सूचना मागवत या संदर्भात नियम/नियमावली तातडीने जाहीर करावी अशी मागणी या वेळी करण्यात आली.

यावेळी मुकुंद किर्दत, चिंतामणी कांगो, अशोक मेहंदळे, डॉ सिमी आठवले, आशिष गुंजाळ, श्रीकांत भिसे, डॉ.राहुल सावंत, नीता केळकर, राजश्री गावडे, शीला परळीकर, गिरिजा गोडबोले, शुभदा जोशी, ज्योती जाधव, अनुजा जोशी, हेमंत गोळे, पूनम माजगावकर, शंकर थोरात, अनंत झानपुरे व इतर उपस्थित होते.

निवेदन
आपल्या प्रभागातील समस्या, दैनंदिन अडचणी, फसवणूक, अन्याय-अत्याचार, मुजोरी तसेच आपल्या मनातील सूचना, शंका, उपाय यासाठी सा. संघर्षाचा आवाज आपणास खास व्यासपीठ मिळवून देत आहे. करा त्वरा, होऊ द्या मनातला निचरा!
संपर्क : ७२७६८७१००८, ९६६५४८७१३४

धम्मचक्र प्रवर्तन : मानवी प्रतिष्ठेच्या परिवर्तनाची ऐतिहासिक पहाट - डॉ.राजेंद्र बगाटे

दि.१४ ऑक्टोबर हा दिवस भारतीय समाजाच्या इतिहासातील सामाजिक जागृती, स्वाभिमान आणि समतेच्या नव्या पर्वाचे स्मरण करून देतो. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि आपल्या लाखो अनुयायांना धम्मदीक्षा दिली. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस 'धम्मचक्र प्रवर्तन दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ धर्मांतराच्या घटनेपुरते मर्यादित नाही. तो अन्यायकारक सामाजिक रचनेला नकार देऊन मानवी प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि विवेकनिष्ठ जीवनाचा स्वीकार करण्याचा संकल्प आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धम्मदीक्षेच्या माध्यमातून समाजाला नवी वैचारिक दिशा दिली. माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर किंवा जातीवर ठरत नसून त्याच्या मानवी अस्तित्वावर ठरले पाहिजे, हा विचार या परिवर्तनाच्या केंद्रस्थानी होता. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिन हा भूतकाळातील एका महत्त्वपूर्ण घटनेचा स्मृतिदिन असण्याबरोबरच वर्तमानातील सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे.

भारतीय समाजात जातिभेद आणि अस्पृश्यतेमुळे अनेक पिढ्यांना सामाजिक अन्यायाचा सामना करावा लागला. जन्माच्या आधारावर व्यक्तीचे स्थान ठरविणाऱ्या व्यवस्थेमुळे काही समूहांना शिक्षण, सार्वजनिक पाणवठे, धार्मिक स्थळे आणि प्रतिष्ठेच्या संधींपासून दूर ठेवण्यात आले. व्यक्तीचे ज्ञान, कर्तृत्व आणि नैतिकता यांपेक्षा तिची जात महत्त्वाची मानली गेली. परिणामी, सामाजिक विषमता केवळ आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रापुरती मर्यादित राहिली नाही, तर ती मानवी संबंधांमध्ये आणि व्यक्तीच्या आत्मभानातही रुजली. अशा परिस्थितीत समानतेचा आग्रह धरणे म्हणजे प्रस्थापित सामाजिक समजुतींना आव्हान देणे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या व्यवस्थेचे स्वरूप स्वतः अनुभवले आणि तिच्या कारणांचा सखोल अभ्यास केला. त्यांनी अन्यायाला नशिबाचा भाग मानण्याऐवजी त्याविरुद्ध संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या कार्यामुळे वंचित समूहांमध्ये आपल्या अधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली आणि सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा पाया शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्त्वांवर उभा होता. प्रतिकूल परिस्थितीत उच्च शिक्षण प्राप्त करून त्यांनी अर्थशास्त्र, कायदा, राज्यव्यवस्था आणि समाजरचना यांचा अभ्यास केला. त्यांनी मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग वैयक्तिक प्रगतीपुरता मर्यादित न ठेवता सामाजिक परिवर्तनासाठी केला. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहातून सार्वजनिक पाण्यावर समान हक्काचा प्रश्न उपस्थित झाला. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश आंदोलनाने धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील भेदभावाला आव्हान दिले. या आंदोलनांचे महत्त्व केवळ एखाद्या ठिकाणी प्रवेश मिळविण्यात नव्हते, तर समान नागरिकत्व आणि मानवी प्रतिष्ठेचा अधिकार अधोरेखित करण्यात होते. समाजातील सार्वजनिक साधनसंपत्ती, शिक्षण आणि संधी यांवर सर्वांचा समान हक्क असला पाहिजे, हा विचार या संघर्षांतून व्यक्त झाला. सामाजिक न्यायासाठी केवळ सहानुभूती पुरेशी नसते; अधिकारांची मान्यता आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी आवश्यक असते, हे डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीने दाखवून दिले.

सामाजिक परिवर्तनासाठी बाह्य परिस्थितीत बदल घडविण्याबरोबरच व्यक्तीच्या विचारविश्वातही परिवर्तन घडले पाहिजे, अशी डॉ. आंबेडकर यांची भूमिका होती. जातीय विषमता टिकवून ठेवणाऱ्या रूढी, पूर्वग्रह आणि अंधानुकरणाचा चिकित्सक विचार केल्याशिवाय समाजाला मुक्ती मिळू शकत नाही. व्यक्तीने स्वतःच्या परिस्थितीचे आकलन करावे, अन्याय ओळखावा आणि त्याविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य विकसित करावे, हा त्यांच्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता. स्वाभिमान म्हणजे दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ असल्याची भावना नव्हे, तर स्वतःला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे याची जाणीव आणि इतरांच्या प्रतिष्ठेचा आदर होय. अशा स्वाभिमानातून व्यक्तीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि सामाजिक जीवनातील सहभाग वाढतो. समतेचा विचार स्वीकारणारा समाज कोणत्याही व्यक्तीला तिच्या जन्माच्या आधारावर कमी लेखत नाही. म्हणूनच सामाजिक न्यायाची सुरुवात प्रत्येक व्यक्तीला समान मानवी प्रतिष्ठा देण्यापासून होते.

१९३५ मध्ये येवला जि. नाशिक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराचा निर्धार जाहीर केला. हा निर्णय त्यांच्या दीर्घ वैचारिक चिंतनाचा आणि सामाजिक अनुभवांचा परिणाम होता. धर्माचा मानवी जीवनावर, सामाजिक संबंधांवर आणि नैतिक मूल्यांवर होणारा परिणाम त्यांनी तपासला. त्यांनी विविध धार्मिक परंपरा आणि तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला. त्यांच्या दृष्टीने धर्माने माणसाला विवेकशील जीवनाची प्रेरणा द्यावी, नैतिक आचरणाला महत्त्व द्यावे आणि मानवी प्रतिष्ठेच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करावे. गौतम बुद्धांच्या धम्मात त्यांना प्रज्ञा, करुणा, समता आणि नैतिकतेचा समन्वय आढळला. त्यामुळे बौद्ध धम्माचा स्वीकार हा केवळ धार्मिक ओळख बदलण्याचा निर्णय नव्हता, तर अन्यायकारक सामाजिक संकेतांना नकार देऊन मानवी मूल्यांवर आधारित जीवनाचा स्वीकार होता. या निर्णयामागे आत्मसन्मान, सामाजिक मुक्ती आणि समताधिष्ठित समाजनिर्मितीची व्यापक आकांक्षा होती.

दि. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भदंत चंद्रमणी महास्थविर यांच्याकडून बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि त्यानंतर आपल्या अनुयायांना धम्मदीक्षा दिली. ही घटना भारतीय सामाजिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरली. लाखो लोकांच्या सहभागातून व्यक्त झालेल्या या परिवर्तनाने स्वाभिमान आणि नव्या सामाजिक ओळखीचा संदेश दिला. दीक्षाभूमी हे आज समता, सामाजिक जागृती आणि मानवी प्रतिष्ठेचे प्रतीक बनले आहे. धम्मदीक्षेमुळे अनेकांना आपल्या जीवनाकडे नव्या दृष्टीने पाहण्याची प्रेरणा मिळाली. आपणही समाजाचे समान सदस्य आहोत, आपल्याला शिक्षण आणि प्रगतीचा अधिकार आहे आणि समाजाच्या परिवर्तनात आपली भूमिका महत्त्वाची आहे, अशी जाणीव दृढ झाली. धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ऐतिहासिक आशय याच सामूहिक आत्मभानात सामावलेला आहे. या दिवसातून मिळणारी प्रेरणा आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी या घटनेचा सामाजिक आणि वैचारिक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.



डॉ.राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्र, पाली व बौद्ध साहित्याचे अभ्यासक आहेत)
ईमेल – bagate.rajendra5gmail.com

धम्मदीक्षेच्या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेल्या बावीस प्रतिज्ञांना या परिवर्तनात विशेष महत्त्व आहे. या प्रतिज्ञांमधून अंधानुकरणाला नकार, विषमता टिकविणाऱ्या प्रथांपासून दूर जाण्याचा निर्धार आणि बुद्धांच्या धम्मातील नैतिक मूल्यांचा स्वीकार व्यक्त होतो. प्रतिज्ञा उच्चारणे हा परिवर्तनाचा आरंभ असू शकतो; मात्र त्या प्रतिज्ञांनुसार जगणे ही त्यांची खरी कसोटी आहे. जातीय श्रेष्ठत्वाची भावना टाळणे, अन्यायाला पाठिंबा न देणे, विवेकाच्या आधारे निर्णय घेणे आणि सर्व व्यक्तींशी सन्मानाने वागणे या मूल्यांचा व्यवहारात स्वीकार करणे आवश्यक आहे. धम्माचा स्वीकार केल्यानंतर सामाजिक प्रश्न आपोआप सुटतात असे नाही. त्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षण आणि सामाजिक जबाबदारी आवश्यक असते. प्रतिज्ञा व्यक्तीला आपल्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करण्याची संधी देतात. आपल्या कृतींमुळे इतरांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचत नाही ना, आपण भेदभावाला नकळत प्रोत्साहन देत नाही ना, असे प्रश्न स्वतःला विचारणे हीदेखील परिवर्तनाची महत्त्वाची प्रक्रिया आहे.

गौतम बुद्धांच्या धम्मात प्रज्ञा, करुणा आणि शील या मूल्यांना मध्यवर्ती स्थान आहे. प्रज्ञा म्हणजे विवेकपूर्ण विचारातून सत्याचा शोध घेणे. करुणा म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी संवेदनशीलतेने प्रयत्न करणे. शील म्हणजे नैतिक आचरण आणि आपल्या कृतींबद्दल जबाबदारीची जाणीव ठेवणे. ही मूल्ये व्यक्तीला स्वतःच्या हितापुरता विचार करण्यापासून दूर नेतात आणि समाजाच्या व्यापक कल्याणाकडे पाहण्याची दृष्टी देतात. दुसऱ्याच्या अडचणींकडे दुर्लक्ष न करणे, मतभेद असतानाही संवाद साधणे, द्वेषाऐवजी संयमाचा मार्ग स्वीकारणे आणि अन्याय होताना मौन न बाळगणे ही या मूल्यांची व्यावहारिक रूपे आहेत. आजच्या स्पर्धात्मक जीवनात संपत्ती, पद आणि प्रतिष्ठा यांना मोठे महत्त्व दिले जाते. अशा परिस्थितीत प्रज्ञा आणि करुणेचा समन्वय व्यक्तीला अधिक संवेदनशील बनवू शकतो. माणसाच्या यशाचे मोजमाप केवळ त्याच्या वैयक्तिक संपत्तीवर न करता समाजासाठी त्याने केलेल्या योगदानावरही केले पाहिजे, अशी जाणीव या मूल्यांमधून निर्माण होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भारतीय संविधानाशीही घनिष्ठ संबंध आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार दिला असून अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याची तरतूद केली आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाही जीवनाची मूलभूत मूल्ये आहेत. मात्र, कायद्याने समानता मान्य केली म्हणून समाजातील सर्व प्रकारचे भेदभाव आपोआप संपत नाहीत. जातीय पूर्वग्रह, सामाजिक बहिष्कार, आर्थिक शोषण आणि महिलांना दुय्यम स्थान देणाऱ्या प्रवृत्ती आजही विविध स्वरूपांत आढळतात. म्हणून संविधानाचा सन्मान करणे म्हणजे केवळ त्यातील तरतुदींची माहिती ठेवणे नव्हे, तर त्यातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरविणे होय. सार्वजनिक ठिकाणी समानतेने वागणे, इतरांच्या अधिकारांचा आदर करणे, अन्यायाविरुद्ध कायदेशीर मार्गाने आवाज उठविणे आणि सामाजिक सलोखा टिकविणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लोकशाहीची मजबुती केवळ शासनसंस्थांवर अवलंबून नसते; ती नागरिकांच्या वर्तनात आणि परस्पर संबंधांमध्येही प्रतिबिंबित झाली पाहिजे.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला स्वाभिमान, स्वावलंबन आणि सामाजिक प्रगतीशी जोडले. शिक्षणामुळे व्यक्तीला स्वतःच्या हक्कांची जाणीव होते, प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित होते आणि रूढ समजुतींची चिकित्सा करता येते. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळविणे किंवा रोजगार प्राप्त करणे एवढाच नसावा. वैज्ञानिक दृष्टिकोन, नैतिकता, सामाजिक संवेदनशीलता आणि लोकशाही मूल्ये विकसित करणे हेही शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये जात, धर्म, भाषा, लिंग किंवा आर्थिक स्थितीच्या आधारावर भेदभाव होणार नाही, असे वातावरण निर्माण केले पाहिजे. वंचित विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, डिजिटल साधने आणि प्रगतीच्या समान संधी मिळणे आवश्यक आहे. ज्ञानामुळे व्यक्ती सक्षम होते; परंतु ज्ञानाबरोबर सामाजिक जबाबदारी विकसित झाली, तर शिक्षण समाजाच्या व्यापक कल्याणासाठी अधिक प्रभावी ठरते.

समताधिष्ठित समाजनिर्मितीत स्त्री-पुरुष समानतेलाही महत्त्वाचे स्थान आहे. महिलांना शिक्षण, रोजगार, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. कौटुंबिक हिंसा, हुंडा, बालविवाह, रोजगारातील भेदभाव आणि महिलांच्या मतांकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती या समाजातील असमानतेच्या समस्या आहेत. मुलगा आणि मुलगी यांच्यात भेद न करणे, घरातील जबाबदाऱ्या समानतेने वाटून घेणे, महिलांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे आणि सार्वजनिक जीवनातील त्यांचा सहभाग वाढविणे ही प्रत्यक्ष परिवर्तनाची पावले आहेत. समतेचा स्वीकार करणारा समाज महिलांच्या अधिकारांकडे दुय्यम प्रश्न म्हणून पाहू शकत नाही. महिलांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगता येणे, त्यांच्या क्षमतांना वाव मिळणे आणि त्यांना स्वतःच्या आयुष्याविषयी निर्णय घेता येणे हे न्याय्य समाजाचे महत्त्वाचे लक्षण आहे. करुणा आणि समता ही मूल्ये प्रत्यक्षात उतरवायची असतील, तर महिलांविषयीच्या सामाजिक दृष्टिकोनातही बदल घडवावा लागेल.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान काळात विवेकनिष्ठ विचारांची गरज अधिक वाढली आहे. सामाजिक माध्यमांवर माहितीचा वेग प्रचंड असला, तरी प्रत्येक माहिती सत्य असेलच असे नाही. अफवा, द्वेषपूर्ण संदेश आणि अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे दावे समाजात गैरसमज निर्माण करू शकतात. अशा वेळी माहितीची सत्यता तपासणे, पुराव्यांच्या आधारे विचार करणे आणि मतभिन्नतेचा आदर राखणे आवश्यक आहे. दुसऱ्या व्यक्तीच्या श्रद्धेशी किंवा विचारांशी असहमती असली, तरी तिचा अपमान करणे योग्य नाही. संवाद आणि विवेकाच्या आधारे मतभेद सोडविण्याची संस्कृती लोकशाहीला बळकटी देते. बुद्धांचा विवेकनिष्ठ दृष्टिकोन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक न्यायाचा आग्रह स्वीकारल्यास समाजात जबाबदार चर्चा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सहिष्णुता वाढू शकते. तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानाचा प्रसार, शैक्षणिक मदत आणि सामाजिक जागृतीसाठी केला, तर तो अधिक समताधिष्ठित समाजनिर्मितीचे साधन ठरू शकतो.

धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करताना दीक्षाभूमीवरील कार्यक्रम, धम्मवंदना, व्याख्याने आणि सांस्कृतिक उपक्रमांना महत्त्व आहे. या कार्यक्रमांमुळे इतिहासाचे स्मरण होते आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते. मात्र, या दिवसाचे महत्त्व केवळ सोहळ्यांपुरते मर्यादित ठेवता कामा नये. वाचनसंस्कृती वाढविणे, आरोग्यविषयक जनजागृती करणे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे आणि जातीय भेदभावाविरुद्ध संवाद घडविणे अशा उपक्रमांमधून धम्माचा सामाजिक आशय अधिक प्रभावीपणे व्यक्त होऊ शकतो. तरुणांनी बुद्धांच्या विचारांचा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखनाचा अभ्यास करून त्यांचा संबंध आजच्या सामाजिक प्रश्नांशी जोडला पाहिजे. इतिहासातील महान व्यक्तींचा गौरव करणे आवश्यक असले, तरी त्यांच्या विचारांनुसार वर्तमानातील समस्यांवर काम करणे अधिक महत्त्वाचे आहे. सामाजिक बांधिलकीतून उभे राहणारे उपक्रम धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या संदेशाला दैनंदिन जीवनाशी जोडतात.

धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा खरा संदेश समता, स्वाभिमान आणि मानवी प्रतिष्ठेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीत आहे. समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी कायदे, शिक्षण, सामाजिक चळवळी आणि वैयक्तिक आचरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. समता ही घोषणेत नव्हे, तर व्यवहारात दिसली पाहिजे; बंधुता भाषणापुरती न राहता परस्परांच्या दुःखाची जाणीव ठेवणाऱ्या कृतींतून व्यक्त झाली पाहिजे; आणि विवेक हा केवळ चर्चेचा विषय न राहता निर्णयांचा आधार बनला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगता येईल, प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळेल, महिलांना समान अधिकार मिळतील आणि जात-धर्माच्या भिंतींपलीकडे मानवी नात्यांची उभारणी होईल, असा समाज निर्माण करणे हीच या दिवसाची खरी प्रेरणा आहे. १४ ऑक्टोबर रोजी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे स्मरण करताना आपण स्वतःच्या विचारांचे आणि वर्तनाचे परीक्षण करून प्रज्ञा, करुणा, समता आणि बंधुता या मूल्यांनुसार जगण्याचा संकल्प करूया. कारण धम्मचक्र प्रवर्तनाचा खरा अर्थ इतिहासातील परिवर्तनाचा गौरव करण्यातच नाही, तर त्या परिवर्तनाला आपल्या जीवनातून आणि सामाजिक कृतीतून पुढे नेण्यात आहे. या मूल्यांचा सातत्याने स्वीकार केला, तर अधिक न्याय्य, संवेदनशील आणि मानवी समाजाच्या निर्मितीचा मार्ग अधिक दृढ होईल.

दुष्काळ, पाऊस, पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांच्या चाऱ्याबाबत राज्य शासनाकडून केंद्रीय पथकाकडे सविस्तर सादरीकरण

मुंबई : खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे.

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे.

राज्य शासनाकडून दुष्काळी स्थितीचे सविस्तर सादरीकरण

केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे आज मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.



मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला.

कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सुरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

पिण्याच्या पाण्याच्या स्थितीचा आढावा

राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज यांच्यासह ऊर्जा विभागाच्या वतीने सद्यस्थितीचा आढावा सादर करुन आगामी सात महिन्यातील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. यावेळी लघुपाटबंधारे तलाव (एमआय टँक), गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली.

प्रत्यक्ष पाहणीसाठी जिल्हे आणि ठिकाणे निश्चित

राज्य शासनाने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीची केंद्रीय पथकाने दखल घेतली. या माहितीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोणत्या जिल्ह्यांना आणि ठिकाणांना भेटी द्यायच्या, याबाबत नियोजन करण्यात आले.

केंद्रीय पथकातील अधिकारी राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यासाठी विविध पथके तयार करुन जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाहणीदरम्यान स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही उपस्थित राहणार आहेत. प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा करणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य आणि राज्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



